Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-IV APRIL 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# महाराष्ट्रातील शासकिय विशेष अनुदान प्राप्त शतायुषी सार्वजनिक ग्रंथालयांचा अभ्यास

**प्रा. सुरेन्द्र मुरलीधरराव गोठाणे**
ग्रंथपाल
श्री समर्थ कला व वाणिज्य महाविद्यालय, आष्टी, ता. आष्टी,
जि. वर्धा

**प्रा. डॉ.दत्तात्रय आर.देशपांडे**
सेवानिवृत्त प्राचार्य,
अग्निहोत्री कॉलेज ऑफ लायब्ररी ॲण्ड इन्फॉरमेशन सायन्स,
वर्धा

## १.० प्रस्तावना

मनुष्य हा एक सामाजिक प्राणी आहे. आणि नविन–नविन ज्ञान प्राप्त करण्याची व आत्मसात करण्याची योग्यता त्याला इतर प्राण्याच्या तुलनेत उच्च ज्ञान मिळवून देते. मानव बुद्धी संपन्न आहे. मानवाच्या उत्क्रांती पासूनच माहितीचा उपयोग या ना त्या कारणासाठी, तसेच कोणत्याना कोणत्या तरी स्वरुपात नेहमीच करावा लागला आहे. मानवाचा जसजसा विकास होत गेला तसतशी माहिती सुरक्षित साठवून ठेवण्याची पद्धती बदलली (पारखी, २०१२). इतकेच नव्हे तर माहितीच्या प्रकारात व स्वरुपात सुद्धा बदल झालेत. सध्या माहिती संग्रह करण्याकरीता विशेष प्रकारच्या ग्रंथालयांचा वापर होत असल्याचे आढळते. सर्व ग्रंथालयातील निरनिराळे वाचन साहित्य वाचकांनी पाहावे, हाताळावे त्याचा अधिक वापर करावा हाच ग्रंथालयाचा प्रमुख उद्देश असतो (नरगुंदे, २०१३).

समाजोन्नतीसाठी विविध प्रकारच्या सामाजिक संस्था कार्य करीत असतात. त्यांच्यामुळेच समाजाचा विविध अंगांनी विकास होत असतो. सार्वजनिक ग्रंथालय ही अशीच एक सामाजिक संस्था आहे. सार्वजनिक या नावामध्येच या ग्रंथालयाचे स्वरूप दडलेले आहे. इतर सामाजिक संस्थांप्रमाणे या संस्थेचे कार्य एका विशिष्ट क्षेत्रापुरतेच मर्यादित नसते तर ते विविध क्षेत्रांशी, समाजातील सर्व घटकांशी निगडित असते. सार्वजनिक ग्रंथालये समाजातील सर्व लोकांना त्यांच्या गरजेनुसार कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वप्रकारच्या ग्रंथालयसेवा उपलब्ध करून देऊन समाजाला प्रगतिपथावर नेण्याचे, त्याची जडणघडण करण्याचे कार्य करतात (सावे व पौडवाल, २०१४). सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे 'जनतेने, जनतेसाठी, जनतेच्या पैशातुन चालविलेले ग्रंथालय म्हणजे सार्वजनिक ग्रंथालय होय.' सार्वजनिक ग्रंथालय हे वर्तमान काळातही स्वयंशिक्षणाचे एक उत्तम साधन आहे.

सार्वजनिक ग्रंथालयात सर्वच प्रकारचे वाचक येत असतात. जसे बाल, तरूण, प्रौढ, संशोधक, अभ्यासक तसेच सर्व जाती धर्माचे वाचक इत्यादिचा समावेश होतो. त्यामुळे सर्वच प्रकारच्या व सर्वच स्तरावरील वाचन साहित्याचा व साधनांचा समावेश सार्वजनिक ग्रंथालयात होतो (बालेकर, २०१२). महाराष्ट्रात जी सार्वजनिक ग्रंथालये आहेत त्यांची स्थिती व त्यातील ज्या सार्वजनिक ग्रंथालय स्थापन होवून १०० वर्षे झालेली आहे. म्हणजेच महाराष्ट्रातील शतायुषी ग्रंथालये. या ग्रंथालयाची स्थिती कशी आहे याचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. महाराष्ट्रातील जी शतायुषी ग्रंथालये आहेत त्यांना महाराष्ट्र शासनाकडून विशेष अनुदान प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे अशा विशेष अनुदान प्राप्त शतायुषी ग्रंथालयांनी या विशेष अनुदानाचा कशा प्रकारे उपयोग केला आहे याचा अभ्यास या संशोधनकार्यात करण्यात आला आहे.

## २.० संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनकार्यात निर्दोष माहिती मिळविण्यासाठी संशोधनाची उद्दिष्टे अभ्यासुन सर्वेक्षण व विश्लेषण पद्धतीचा उपयोग करण्यात आला (धुरी, २००८). या अभ्यासाची व्याप्ती महाराष्ट्र राज्यापूर्ती होती. या अभ्यासात सार्वजनिक ग्रंथालय विचारात घेतांना ज्या ग्रंथालयांना स्थापन होऊन शंभरपेक्षा जास्त वर्ष झाली अशा ग्रंथालयांचा विचार करण्यात आला. तसेच ज्या ग्रंथालयांना शतकोत्तर ग्रंथालय म्हणून महाराष्ट्र राज्य सरकारचे विशेष अनुदान प्राप्त आहे तीच ग्रंथालये अभ्यासण्यात आली. महाराष्ट्रात अशी ८३ ग्रंथालये आहेत. सदर विशेष अनुदान प्राप्त झाल्याने या शतकोत्तर ग्रंथालयाचा २००८ ते २०१३ या कालावधीतील वाढ व विकास याचा अभ्यास करण्यात आला.

### २.१ अध्ययन विश्व, जनसंख्या, न्यादर्श व नमुना निवड

प्रस्तूत अध्ययनात महाराष्ट्र राज्याचा अध्ययन विश्व म्हणून विचार करण्यात आला. प्रस्तुत संशोधनामध्ये महाराष्ट्रातील सर्व शतायुषी सार्वजनिक ग्रंथालये जनसंख्येत मोडतात. प्रस्तुत संशोधनकार्यात निवडण्यात आलेला नमुना संपूर्ण अध्ययन विश्वाचे

प्रतिनिधीत्व करणारा आहे याची खबरदारी संशोधनकर्त्याने घेतलेली आहे. या अध्ययनात महाराष्ट्रातील ८३ शतायुषी सार्वजनिक ग्रंथालयांचे अध्ययन करण्यात आले.

**२.२ संशोधन आराखडा**

प्रस्तुत संशोधनात निर्माण झालेल्या निष्कर्षाची संशोधन उद्देशाच्या दृष्टीने संबद्धता व संशोधन कार्यात मितव्ययता याची सांगड घालण्यात आली आहे (जरारे, १९९५). अर्थातच तथ्यांचे योग्य संकलन व विश्लेषण यासाठी आवश्यक अटीची पूर्तता करून वर्णनात्मक संशोधन आराखडयाची निवड करण्यात आली आहे.

**२.३ तथ्य संकलन**

प्रस्तुत अध्ययनात माहिती संकलित करण्याकरिता प्रमाणीकृत पद्धतीचा व प्रश्नावलीचा उपयोग करण्यात आला. अध्ययनाच्या उद्दिष्टांना अनुसरून प्रश्नावली तयार करण्यात आली. तथ्य संकलनासाठी महाराष्ट्रातील शतायुषी सार्वजनिक ग्रंथालयांतील ग्रंथपालांकडून सर्वेक्षण माध्यमाने माहिती प्राप्त केल्या गेली. प्रस्तुत संशोधनात माहिती एकत्रीत करण्याआधी वापरण्यात आलेल्या प्रश्नावलीची विश्वसनियता व वैधता तपासण्यात आली.

**२.४ सांख्यकिय विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनकार्यात प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन करुन आलेख, विवेचन व पृथःकरण व सांख्यकिय विश्लेषण करण्यात आले. प्राप्त माहितीवरुन मध्यमान, मानक विचलन, वारंवारीता, बहुलक, इ. काढण्यात आले. त्याचप्रमाणे माहितीच्या विश्लेषणाकरीता 'Chi-Square' test चा वापर करण्यात आला. Significance Level 0.05 निर्धारीत करण्यात आली.

**३.० महिती संकलन व विश्लेषण**

**३.१ ग्रंथालयाचे स्थापना वर्ष**

**सारणी क्र. १: अध्ययन क्षेत्रातील ग्रंथालयाच्या स्थापना वर्षासंबंधी माहीती**

| | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| १८५० च्या पूर्वी | ५ | ६.० |
| १८५०—१८६५ | २० | २४.१ |
| १८६५—१८८० | २८ | ३३.७ |
| १८८०—१८९५ | १५ | १८.१ |
| १९९५ नंतर | १५ | १८.१ |
| एकूण | ८३ | १००.० |

**काई वर्ग मूल्यः—** १६.९४, **स्वातंत्र्यांश —** ४, **तालिका मूल्यः—**९.४९, **P मूल्यः—**<0.05

सारणी क्र. १ मध्ये ग्रंथालयाचे स्थापना वर्षासंबंधी महाराष्ट्रातील शासकीय विशेष अनुदान प्राप्त ग्रंथालयांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ६ टक्के ग्रंथालयाची स्थापना वर्ष १८५० पूर्वी झाली असून २४.१ टक्के ग्रंथालयाची स्थापना वर्ष १८५० —१८६५ दरम्यान झाली असल्याचे आढळले. तसेच ३३.७ टक्के ग्रंथालयांची स्थापना वर्ष १८६५ — १८८० दरम्यान झाली असून प्रत्येकी १८.१ टक्के ग्रंथालयांची स्थापना अनुक्रमे वर्ष १८८०—१९८५ व वर्ष १९९५ नंतर झाली असल्याचे निदर्शनास आले.

**३.२ ग्रंथालयाला शासनाकडून मान्यता मिळाल्याचे वर्ष**

**सारणी क्र. २: अध्ययन क्षेत्रातील ग्रंथालयाला शासनाकडून मान्यता मिळाल्याच्या वर्षासंबंधी ग्रंथालयांच्या प्रतिक्रिया**

| | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| १९५० ते १९५५ | २८ | ३३.७ |
| १९५५ ते १९६० | ५ | ६.० |

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V | Issue-IV | APRIL | 2018 | ISSN 2349-638x | Impact Factor 4.574

| | | |
|---|---|---|
| १९६० ते १९६५ | १९ | २२.९ |
| १६६५ ते १९७० | २४ | २८.९ |
| १९७० ते १९७५ | ७ | ८.४ |
| **एकूण** | ८३ | १००.० |

**काई वर्ग मूल्य**:– २५.१३३, **स्वातंत्र्यांश** – ४, **तालिका मूल्य**:–९.४९, **P मूल्य**:–<0.05

सारणी क्र. २ मध्ये ग्रंथालयाला शासनाकडून मान्यता मिळाल्याच्या वर्षासंबंधी महाराष्ट्रातील शासकीय विशेष अनुदान प्राप्त ग्रंथालयातील ग्रंथालयांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ३३.७ टक्के ग्रंथालयाला वर्ष १९५० ते १९५५ दरम्यान शासनाकडून मान्यता मिळाली असून ६ टक्के ग्रंथालयाला वर्ष १९५५ ते १९६० दरम्यान शासनाकडून मान्यता मिळाली असल्याचे आढळले. तसेच २२.९ टक्के व २८.९ टक्के ग्रंथालयाला अनुक्रमे वर्ष १९६० ते १९६५ व १९६५ ते १९७० दरम्यान शासनाकडून मान्यता मिळाली असून ८.४ टक्के ग्रंथालयाला १९७० ते १९७५ दरम्यान शासनाकडून मान्यता मिळाली असल्याचे निदर्शनास आले.

### ३.३ ग्रंथालयाचा दर्जा

**सारणी क्र. ३: अध्ययन क्षेत्रातील ग्रंथालयाचा दर्जा**

| | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| अ | ६८ | ८१.९ |
| ब | १५ | १८.१ |
| **एकूण** | ८३ | १००.० |

**काई वर्ग मूल्य**:– ३३.८४३, **स्वातंत्र्यांश** – १, **तालिका मूल्य**:–३.८४, **P मूल्य**:–<0.05

सारणी क्र. ३ मध्ये ग्रंथालयाच्या दर्जासंबंधी महाराष्ट्रातील शासकीय विशेष अनुदान प्राप्त ग्रंथालयातील ग्रंथालयांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ८१.९ टक्के ग्रंथालय 'अ' दर्जाचे असून १८.१ टक्के ग्रंथालय 'ब' दर्जाचे असल्याचे निदर्शनास आले.

### ३.४ ग्रंथालयाला २००८ ते २०१३ या पाच वर्षात मिळालेले अनुदान

**सारणी क्र ४: ग्रंथालयाला २००८ ते २०१३ या पाच वर्षात मिळालेल्या अनुदानासंबंधी माहिती**

| | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ |
|---|---|---|---|---|---|
| मध्यमान | २६५४२८ | ३०७९४८ | २७१५७८ | ३०११७४ | ३६७५७९ |
| मानक विचलन | ±१५१२९८ | ±१९८६५० | ±१२२३८६ | ±१६४७०१ | ±१८४८८९ |
| किमान | ४८००० | २५६०० | २५१५३ | ४५००० | १२८००० |
| कमाल | ४८०००० | ७३१००० | ४८०००० | ७२०००० | ७२०००० |

सारणी क्र. ५ मध्ये मागील पाच वर्षात मिळालेल्या अनुदानासंबंधी महाराष्ट्रातील शासकीय विशेष अनुदान प्राप्त ग्रंथालयाची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार वर्ष २००८–०९ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. २६५४२८±१५१२९८ अनुदान प्राप्त झाले असून वर्ष २००९–१० मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. ३०७९४८±१९८६५० अनुदान प्राप्त झाले. तसेच वर्ष २०१०–११ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. २७१५७८±१२२३८६ अनुदान प्राप्त झाले असून वर्ष २०११–१२ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. ३०११७४±१६४७०१ अनुदान प्राप्त झाले असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे वर्ष २०१२–१३ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. ३६७५७९±१८४८८९ अनुदान प्राप्त झाले असल्याचे निदर्शनास आले.

## ३.५ ग्रंथालयातील उत्पन्नाची साधने

### ३.५.१ प्रवेश शुल्क

सारणी क्र. ५: ग्रंथालयाला मागील पाच वर्षात प्रवेश शुल्क द्वारे मिळालेल्या उत्पन्नासंबंधी माहिती

| | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ |
|---|---|---|---|---|---|
| मध्यमान | ११३७ | ६९३५ | ११३५० | १७७४ | २०७५ |
| मानक विचलन | १२१६ | १६२७६ | ३२३५० | ३०६८ | ३३२४ |
| किमान | ५० | ५० | ५० | ५ | ५ |
| कमाल | ३०७५ | ६४२३० | १३२४७६ | ११८७५ | १२५३० |

सारणी क्र. ५ मध्ये मागील पाच वर्षात प्रवेश फी द्वारे मिळालेल्या उत्पन्नासंबंधी महाराष्ट्रातील शासकीय विशेष अनुदान प्राप्त ग्रंथालयाची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार वर्ष २००८–०९ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. ११३७±१२१६ प्रवेश शुल्क प्राप्त झाले असून वर्ष २००९–१० मध्ये सरासरी रू. ६९३५±१६२७६ प्रवेश शुल्क प्राप्त झाले . तसेच वर्ष २०१०–११ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. ११३५० ±३२३५० प्रवेश शुल्क प्राप्त झाले असून वर्ष २०११–१२ मध्ये सरासरी रू. १७७४ ±३०६८ प्रवेश शुल्क प्राप्त झाले असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे वर्ष २०१२–१३ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. २०७५ ±३३२४ प्रवेश शुल्क प्राप्त झाले असल्याचे निदर्शनास आले.

### ३.५.२ वर्गणी

सारणी क्र. ६: ग्रंथालयाला मागील पाच वर्षात वर्गणीद्वारे मिळालेल्या उत्पन्नासंबंधी माहिती

| | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ |
|---|---|---|---|---|---|
| मध्यमान | ५६२०५ | ५१३७७ | ५९५०५ | ७११०७ | ८३५५९ |
| मानक विचलन | ६६४७६ | ७२२५८ | ६५८२८ | ८१४३५ | ९०४३८ |
| किमान | १०१ | १० | १० | १० | १० |
| कमाल | २५२२४७ | २७११०३ | २२४४०२ | ३०९००२ | ३२६१५५ |

सारणी क्र. ६ मध्ये मागील पाच वर्षात वर्गणी द्वारे मिळालेल्या उत्पन्नासंबंधी महाराष्ट्रातील शासकीय विशेष अनुदान प्राप्त ग्रंथालयाची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार वर्ष २००८–०९ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. ५६२०५±६६४७६ वर्गणी प्राप्त झाली असून वर्ष २००९–१० मध्ये सरासरी रू. ५१३७७±७२२५८ वर्गणी प्राप्त झाली. तसेच वर्ष २०१०–११ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. ५९५०५±६५८२८ वर्गणी प्राप्त झाली असून वर्ष २०११–१२ मध्ये सरासरी रू. ७११०७ ±८१४३५ वर्गणी प्राप्त झाली असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे वर्ष २०१२–१३ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. ८३५५९±९०४३८ वर्गणी प्राप्त झाली असल्याचे निदर्शनास आले.

### ३.५.३ देणगी

**सारणी क्र. ७: ग्रंथालयाला मागील पाच वर्षात देणगीद्वारे मिळालेल्या उत्पन्नासंबंधी माहिती**

| | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ |
|---|---|---|---|---|---|
| **मध्यमान** | १९१२७ | २३६९० | ६९८४९०३ | २१४५२ | २९११५ |
| **मानक विचलन** | २३८०४ | ३१४९३ | २६९००५३० | २५९६० | २३६३३ |
| **किमान** | १७०० | ३९६ | ५०१ | ७५० | ४०० |
| **कमाल** | ८४७०० | ९२५७६ | १०४२२४१९८ | ९९९०१ | ७६६०१ |

सारणी क्र. ७ मध्ये मागील पाच वर्षात देणगीद्वारे मिळालेल्या उत्पन्नासंबंधी महाराष्ट्रातील शासकीय विशेष अनुदान प्राप्त ग्रंथालयाची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार वर्ष २००८–०९ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. १९१२७±२३८०४ देणगी प्राप्त झाली असून वर्ष २००९–१० मध्ये सरासरी रू. २३६९०±३१४९३ देणगी प्राप्त झाली. तसेच वर्ष २०१०–११ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. ६९८४९०३±२६९००५३० देणगी प्राप्त झाली असून वर्ष २०११–१२ मध्ये सरासरी रू. २१४५२±२५९६०देणगी प्राप्त झाली असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे वर्ष २०१२–१३ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. २९११५±२३६३३ देणगी प्राप्त झाली असल्याचे निदर्शनास आले.

### ३.५.४ रोख ठेवी

**सारणी क्र. ८: ग्रंथालयाला मागील पाच वर्षात रोख ठेवीद्वारे मिळालेल्या उत्पन्नासंबंधी माहिती**

| | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ |
|---|---|---|---|---|---|
| **मध्यमान** | १२९३०१७ | १२११३०४ | २५८१४४७ | १७०५१२८ | १७८४५३७ |
| **मानक विचलन** | २७७५८६६ | ३०७२५२५ | ४९४१००७ | ३९०४८२४ | ४५८१४७८ |
| **किमान** | २७५०० | १०००० | ९३९५ | २०००० | ११२१ |
| **कमाल** | ८०९४२५० | ८८००४०९ | ९९९१३९३ | १०५४५२६२ | १२१७२४१४ |

सारणी क्र. ८ मध्ये मागील पाच वर्षात रोख ठेवीद्वारे मिळालेल्या उत्पन्नासंबंधी महाराष्ट्रातील शासकीय विशेष अनुदान प्राप्त ग्रंथालयाची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार वर्ष २००८–०९ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. १२९३०१७ ±२७७५८६६ रोख ठेव प्राप्त झाली असून वर्ष २००९–१० मध्ये सरासरी रू. १२११३०४ ± ३०७२५२५ रोख ठेव प्राप्त झाली. तसेच वर्ष २०१०–११ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. २५८१४४७ ±४९४१००७ रोख ठेव प्राप्त झाली असून वर्ष २०११–१२ मध्ये सरासरी रू. १७०५१२८±३९०४८२४ रोख ठेव प्राप्त झाली असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे वर्ष २०१२–१३ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. १७८४५३७±४५८१४७८ रोख ठेव प्राप्त झाली असल्याचे निदर्शनास आले.

### ३.५.५ भाडे प्राप्त

**सारणी क्र. ९: ग्रंथालयाचीमागील पाच वर्षात भाडेप्राप्त रकमेसंबंधी माहिती**

| | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ |
|---|---|---|---|---|---|
| **मध्यमान** | ३८६५५ | ३५४९४ | १३४२९२ | ३५७७५ | ४८८१८ |
| **मानक विचलन** | ३१९५२ | ३२६८० | २७६३७८ | ३४१४० | ५६५६० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **किमान** | ११०० | ४८०० | २४०० | ११०० | ११०० |
| **कमाल** | ९४६२४ | १००२७३ | ८१२००० | ८०८०० | १७८७२६ |

सारणी क्र. ९ मध्ये मागील पाच वर्षात भाडेप्राप्त रकमेसंबंधीमहाराष्ट्रातील शासकीय विशेष अनुदान प्राप्त ग्रंथालयाची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार वर्ष २००८–०९ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. ३८६५५±३१९५२ भाडे प्राप्त झाले असून वर्ष २००९–१० मध्ये सरासरी रू. ३५४९४±३२६८० भाडे प्राप्त झाले. तसेच वर्ष २०१०–११ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. १३४२९२±२७६३७८ भाडे प्राप्त झाले असून वर्ष २०११–१२ मध्ये सरासरी रू. ३५७७५±३४१४० भाडे प्राप्त झाले असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे वर्ष २०१२–१३ मध्ये ग्रंथालयाला सरासरी रू. ४८८१८±५६५६० भाडे प्राप्त झाले असल्याचे निदर्शनास आले.

**५.० निष्कर्ष**

५.१ **ग्रंथालयाचे स्थापना वर्ष** :– प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश ग्रंथालयांची स्थापना वर्ष १८६५–१८८० दरम्यान झाली आहे.

**५.२ ग्रंथालयाला शासनाकडून मान्यता मिळाल्याचे वर्ष** :– प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश ग्रंथालयांना वर्ष १९५०–१९५५ दरम्यान शासनाकडून मान्यता मिळाली आहे.

**५.३ ग्रंथालयाचा दर्जा** :– प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश ग्रंथालय 'अ' दर्जाचे आहे.

**५.४ ग्रंथालयाला मागील पाच वर्षात मिळालेले अनुदान** :– प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश ग्रंथालयाला वर्ष २०१२–१३ मध्ये जास्त अनुदान प्राप्त झाले आहे.

**५.५ ग्रंथालयातील उत्पन्नाची साधने** :–

**५.५.१ प्रवेश शुल्क** :– प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश ग्रंथालयाला वर्ष २०१०–११ मध्ये सर्वाधिक प्रवेश शुल्क प्राप्त झाले.

**५.५.२ वर्गणी** :– प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश ग्रंथालयाला वर्ष २०१२–१३ मध्ये सर्वाधिक वर्गणी प्राप्त झाली.

**५.५.३ देणगी** :– प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश ग्रंथालयाला वर्ष २०१०–११ मध्ये सर्वाधिक देणगी प्राप्त झाली.

**५.५.४ रोख ठेवी** :– प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश ग्रंथालयाला वर्ष २०१०–११ मध्ये सर्वाधिक रोख ठेव प्राप्त झाली.

**५.५.५ भाडे प्राप्त** :– प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश ग्रंथालयाला वर्ष २०१०–११ मध्ये भाडे प्राप्त झाले.

**संदर्भ सुची**

1. पारखी गं. (२०१२), ग्रंथालय विकासदर्शन, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती. पृ. ३
2. नरगुंदे रे. (२०१३), ग्रंथालय आणि सामाजिक विकास, युनिव्हर्सल प्रकाशन,पुणे, पहिली आवृत्ती, पृ. ८
3. सावे, व. आणि पौडवाल (२०१४) सार्वजनिक ग्रंथालये प्रगती आणि वस्तुस्थिती, माधवी प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, पृ. १५.
4. बालेकर रा. शं. (२०१२), सार्वजनिक ग्रंथालय:एक अभ्यास, संगत प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, पान क्र १९
5. धुरी नी. (२००८), संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, पृ.क्र. १.
6. घाटोळे. रा.ना. (२००९), समाजशास्त्रीय संशोधन तत्व व पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, पृ.क्र. १ ते २३.

7. घाटोळे रा. ना. (१९९२) – सामाजिक संशोधन पद्धती व तत्त्वे मंगेश प्रकाशन नागपूर पृ. क्र. ३०
8. भांडारकर पु.ल. (१९७६), सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथ निर्मिती मंडळ, विद्या बुक्स, औरंगाबाद, १४७.
9. जरारे वि. (१९९५), संशोधन प्रणाली, सुविधा पब्लिशर्स, ३५–ए, नटराज नगर, इमली फाटक, जयपूर, ७९
10. बोधनकर सु. व अलोनी वि. (२००३). सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, १४७.
11. वर्मा ओ. (१९८७). सामाजिक अनुसंधान की विधियाँ, ग्रन्युत प्रिंटिंग प्रेस साकेत नगर, कानपूर, ३३५

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com